PAHM-26013(11)/17/2025-AGRI

कृषि अधिकारी यांना २४ वर्षाची नियमित सेवा केल्यानंतर त्यांना पदोन्नती साखळीतील वरच्या पदाची वेतनश्रेणी मंजूरकरणे बाबत. (सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेतर्गतदुसरा लाभ मंजूरकरणेबाबत.)

अहिल्यानगर जिल्हा परिषद
कृषि विभाग
जिल्हा परिषद आदेशक्र कृषि/आस्था/१२६/२०२५
अहिल्यानगरदि१४३/२०२५

वाचा: -१.महाराष्ट्र शासन सापवि कडीलनिर्णयक. एस.आर.व्ही.१०९५/प्र.क्र.९५/बारा,दि.०८/०६/१९९५
२.महा.शासन वित्त विभाग शासननिर्णयक. वेतन-११९९/प्र.क्र.२/९९ सेवा-३ दि.२०/०७/२००१
३.शासन निर्णय सामाजिकन्याय व विशेष सहाय्य विभागाकडीलनिर्णय क्रं.सीबीसी-१०/२००४/प्रक्र-५७०/ मावक-५ दि.१६/०५/२००७
४.महा.शासन वित्त विभाग यांचेकडीलनिर्णयक्र. वेतन/११०९/प्र.क्र.४४/सेवा३,दि.०१/०४/२०१०
५.महा.शासन वित्तविभागाकडील शासननिर्णयक्र.वेतन-१११९/प्रक्र-८/सेवा-३ दि.०१/०७/२०१०
६महा.शासन वित्तविभागाकडील शासननिर्णय क्र.वेतन-११०९/प्रक्र-४१/सेवा-३दि.०५/०७/२०१०
७.महा.शासन, सामाजिकन्याय व विशेष सहाय्य विभाग, परिपत्रकक्र.सीबीसी १०/२०१०/प्र.क्र.५९०/मावक५ दि. ०८/०६/२०११
८.पदोन्नतीनिवड समितीचेइतिवृत्त दि.१६/१२/२०२४

जिल्हा परिषदे अंतर्गत कृषि अधिकारी या संवर्गातील कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नसल्यामुळे असलेली कुंठीतता घालवणे संबंधीची योजना उपरोक्त संदर्भक्र १ अन्वये विहित केलेल्या योजनेच्या अटी व शर्तीचे अधिन राहून सरळसेवेने नियुक्त झालेल्या अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या विस्तार अधिकारी (कृषि) या संवर्गातील कर्मचाऱ्यांना या योजनेतंर्गत २४ वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ पदाची वेतन संरचना अनुज्ञेय असल्याने खालील कर्मचाऱ्यांना त्यांच्या नावांपुढे स्तंभ ६ मध्ये नमुद केलेल्या तारखे पासुन त्यांनी दिलेल्या गट ब मधील महाराष्ट्र विकास सेवा/महाराष्ट्र कृषि सेवेचा पदोन्नतीचा विकल्प विचारात घेऊन पदोन्नती साखळीतील वरिष्ठ पदाची म्हणजेच सहाय्यक गट विकास अधिकारी या पदाची वेतन संरचना पी.बी.१ रुपये ९३००-३४८०० व ग्रेड वेतन- ४४०० व तालुका कृषि अधिकारी वेतन संरचना पी.बी.१ रुपये ९३००-३४८०० व ग्रेड वेतन- ४६०० संदर्भक्र. ६ व ७ च्या शासननिर्णयातील अटी व शर्तीच्या अधीन राहून खालिल तपशिला प्रमाणे दुसरा लाभ मंजुरकरण्यात येत आहे.

| अ. नं. | कृषि अधिकारी या संवर्गातील कर्मचा-यांचे नाव | कार्यालयाचे नाव | प्रथमनियुक्ती दिनांक | पहिला आश्वासीत प्रगती योजनेचापहिला लाभ मिळाल्याचा दिनांक | कृषि अधिकारी पदोन्नती साखळीतील वेतनश्रेणी (दुसरा लाभ) ज्या दिनांका पासूनदेय आहे तोदिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | एकनाथ कोंडाजी अत्रे | पंचायत समितीसंगमनेर | १९/०९/१९७८ | ०१/०६/१९९७ | ०१/०६/२००९ |
| २ | बाळासाहेब आनंदराव ताजणे | पंचायत समिती संगमनेर | १२/०९/१९७८ | ०८/०९/१९९७ | ०८/०९/२००९ |
| ३ | पदमाकर केशव बालोटे | पंचायत समिती शेवगांव | ११/०१/१९७९ | ०८/०९/१९९७ | ०८/०९/२००९ |

अटी व शर्ती :-

१. शासननिर्णयक्र.वेतन/११०९/प्र.क्र.४४/सेवा३ दि.०१/०४/२०१० मुंबई अन्वये सुधारित आश्वासित प्रगती योजना वेतन बँड (१५६००-३९१००) अ ५४०० पर्यतग्रेड वेतनघेणाऱ्या कर्मचाऱ्यांना लागू राहील. या योजने अंतर्गत दुसरा लाभ देणेसाठी पहिल्या लाभानंतर १२ वर्षाची नियमित सेवा पुर्णकेलेल्या कर्मचाऱ्यास पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचनादुसरा लाभ मंजूरकरता येईल. तथापि या योजनेतील पहिला लाभ म्हणून ज्या पदाची वेतनसंरचना मंजूरकरण्यात आलेली आहे. त्या पदाला विवक्षीत सेवाकालावधीनंतरत्या पदाचीकर्तव्य व जबाबदाऱ्या वाढन होता अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचना मंजूरकरण्यात येत असेलतर अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतनसंरचनादुसरा लाभ म्हणून मंजूरकरण्यात येईल.

२. दुसरा लाभ मंजूरकेल्यानंतर पहिल्या लाभाप्रमाणे पदोन्नतीच्यानियमानुसारविकल्प देण्याची मुभा देवून वेतन निश्चितीकरण्यात येईल. कार्यात्मक पदोन्नतीनंतर पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय असणार नाही.

३. सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजना दि.१ ऑक्टोबर २००६ पासून लागू राहील परंतू १ ऑक्टोबर २००६ ते शासन आदेशाच्या दिनांकापर्यंत काल्पनिकरित्या वेतन निश्चितीकरून प्रत्यक्ष लाभ या आदेशाच्यादिनांकापासून म्हणजेच दि.०१ एप्रिल २०१० पासूनदेय राहील. मात्रथकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

४. या योजने अंतर्गतदुसऱ्या लाभासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती शासनानेदिलेल्या असूनत्या खालील प्रमाणे आहेत.

अ) पहिला लाभ घेतलेल्या व त्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांस दुसरा लाभ मंजूरकरारनामातो पहिल्या लाभाप्रमाणे दि.२०/०७/२००१ च्या आदेशामधील व या संबंधी वेळोवेळी निर्गमितकरण्यात आलेल्या स्पष्टीकरणात्मक आदेशातीलतरतुदींच्या अधिन मंजूरकरण्यात यावा. म्हणजेच त्या पदाची वेतनसंरचना मंजूरकरण्यात येणार आहे. त्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळण्यासाठी विहीत केलेल्या अटी व शर्तीची पुर्तृताकरणे आवश्यक राहील.

ब) पहिला लाभ मंजूरकेल्यानंतर संबधितकर्मचारी प्रत्यक्ष पदोन्नतीस अपात्र ठरला अथवा त्याने पदोन्नती नाकारली अशा प्रकरणी पहिला लाभ काढूनघेतलाजात असल्याने अशा कर्मचाऱ्याचा थेट दुसऱ्या लाभा साठी विचार करता येणार नाही. मात्र त्याने त्यानंतर पदोन्नती स्विकारल्याच्या दिनांकापासून १२ वर्षाच्या नियमित सेवेनतरत्याला अन्य अटी व शर्तीच्या अधीन राहून दुसरा लाभ मंजूरकरता येईल.

५. या योजनेखाली पहिला/दुसरा अथवा दोन्ही लाभ मंजूरकेल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नतीनाकारलेल्या अथवा पदोन्नत्तीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांनादेण्यात आलेले लाभ काढूनघेण्यात येईल. अशा लाभाची वसूली करण्यात येईल. सदर वसूलीची संपुर्ण जबाबदारी संबधित आस्थापना अधिकारी यांची राहील.

६. सदरहु सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनेच्या लाभा संदर्भात शासनाकडून सुधारीत आदेश प्राप्त झाल्यास होणाऱ्या दुरूस्तीनुसार व वेतन पडताळणी पथका कडून तपासणीच्या अधिन राहून वेतन निश्चितीमध्ये बदल झाल्यास जादा अदा झालेले वेतन व भत्ते या फरकाची रक्कम वसूल करण्याच्या अटीवर सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनांतर्गत दुसरा लाभ मंजूर करण्यात येत आहे.

७. तसेच या योजनेखालीदेण्यात आलेले लाभ काढूनघेतल्यानंतर संबधितकर्मचाऱ्यांची वेतननिश्चितीजणू काही या योजनेचे लाभ दिले नव्हते असे समजून महाराष्ट्रनागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधीलनियम १२ च्या तरतुदीनुसारकरण्यात यावी.

८. सुधारीत सेवांतर्गत आश्वासीत प्रगती योजनादुसरा लाभ अंतर्गतसाखळी पदोन्नतीच्या पदाचे वेतन बँड अधिकग्रेड वेतन लागू करण्यात यावे. प्रत्यक्षातजबाबदारी व कर्तव्य यात वाढ होत नसल्यास यथास्थित पदोन्नती पदाच्यावेतन संरचनेतील/अकार्यात्मक वेतन संरचनेतीलग्रेड वेतन मंजूरकरण्यात यावे. सदर प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधीलनियम ११(२) नुसार वेतन निश्चितीचा विकल्प देण्याची मुभा आहे.

९. तसेच सोबत बंधपत्राचा (करारनामा) नमुना जोडला आहे सदरचे बंधपत्र संबंधीत कर्मचा-यांकडून भरुन घेवून मुळ सेवा पुस्तकात/दप्तरी ठेवण्यात यावे. सदर आदेशाची नोंद कर्मचा-यांचे मुळ सेवा पुस्तकात घेणेत येऊन सदर आदेशाची सत्वर अंमलबजावणी करण्यात यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202503190900003 असा आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 19-03-2025 16:24:31

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

सबंधित कर्मचारी---------------

द्वारा- गट विकास अधिकारी, पचायत समितीसंगमनेर/शेवगाव

प्रत:- गटविकास अधिकारी, पचायत समिती संगमनेर/शेवगाव

प्रत- मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर

प्रत-कृपि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर